राज्य वेतन सुधारणा समिती २०१७ च्या शिफारशीनुसार शासनाच्या मान्यतेने वेतनस्तर सुधारित केलेल्या संवर्गांची मूळ पदावरील वेतनश्रेणी संरक्षित करणे / सुधारित वेतन स्तरामध्ये वेतन निश्चिती करणेबाबत.

महाराष्ट्र शासन

वित्त विभाग

शासन शुध्दीपत्रक क्रमांक : वेपुर ११२१/प्र.क्र.५/सेवा-९

मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.

दिनांक - १२ जून, २०२४

वाचा :- १) शासन निर्णय क्रमांक : वेपुर ११२१/प्र.क्र.४/सेवा-९, दिनांक १३ फेब्रुवारी, २०२३

२) शासन परिपत्रक क्रमांक : वेपुर-११२३/प्र.क्र.५/सेवा-९, दिनांक २२ फेब्रुवारी, २०२४

शुध्दीपत्रक :-

वाचा येथील क्र.२ येथील दिनांक २२ फेब्रुवारी, २०२४ रोजीच्या परिपत्रकातील क्र.२ च्या पृष्ठावर तिसऱ्या ओळीत "१.१.२०१६ रोजी आश्वासित प्रगती योजनेचा लाभ लागू होत असेल तर त्यानुसार वेतननिश्चिती केल्यानंतर " या वाक्याऐवजी **" १.१.२०१६ रोजी व तद्नंतर पदोन्नती अथवा आश्वासित प्रगती योजनेचा लाभ लागू होत असेल तर त्यानुसार वेतननिश्चिती केल्यानंतर "** असे वाक्य वाचण्यात यावे.

क्र.२ च्या पृष्ठावर पाचव्या ओळीत दि.१.१.२०१६ रोजी च्या पुढे **" किंवा तद्नंतर "** या शब्दांचा समावेश करण्यात यावा.

सदर शासन शुध्दीपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या वेबसाईटवर प्रसिध्द करण्यात आले असून त्याचा संगणक संकेतांक २०२४०६१२१६१४५७७८०५ असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

VINAYAK ARVIND DHOTRE

Digitally signed by VINAYAK ARVIND DHOTRE
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=FINANCE DEPARTMENT,
2.5.4.20=857ec0d4ffa11afd448c1db99e6d5447265170ecc87e6e5c74be1217bec62ba9, postalCode=400032, st=Maharashtra,
serialNumber=EED64FF5F3811D4C3522D8713ED9A9090E2A4F33552EEA2364D17D782C35E926, cn=VINAYAK ARVIND DHOTRE
Date: 2024.06.12 16:28:31 +05'30'

(वि. अ. धोत्रे)

उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति -

राज्यपालांचे सचिव	निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई
मुख्यमंत्री यांचे सचिव	सर्व जिल्हा कोषागार अधिकारी,

अध्यक्ष/उपाध्यक्ष, विधानसभा यांचे खाजगी सचिव सभापती/ उपसभापती, विधानपरिषद यांचे खाजगी सचिव सर्व मंत्री व राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव विधानसभा/विधानपरिषद विरोधी पक्ष नेता सर्व विधानमंडळ सदस्य, विधानभवन, मुंबई मंत्रालयीन सर्व विभाग मंत्रालयीन सर्व विभागाच्या अधिपत्याखालील विभाग प्रमुख # प्रबंधक, उच्च न्यायालय (मूळ शाखा), मुंबई. # प्रबंधक, उच्च न्यायालय (अपील शाखा), मुंबई. #सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई. # सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई. #प्रबंधक,लोक आयुक्त व उप लोक आयुक्त यांचे कार्यालय,मुंबई. # आयुक्त राज्य माहिती आयोग, (सर्व) # सचिव राज्य निवडणूक आयोग, मुंबई. # प्रबंधक, महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण, मुंबई/नागपूर/औंरगाबाद. राज्य महिला आयोग, वरळी, मुंबई. सर्व विभागीय आयुक्त. सर्व जिल्हाधिकारी सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषदा. महासंचालक, यशदा, राजभवन आवान, पुणे	लेखा अधिकारी, वेतन पडताळणी पथक, मुंबई / नागपूर / पुणे / औरंगाबाद. मुख्य अधिकारी, सर्व नगरपालिका कार्यकारी अधिकारी, कॅन्टोनमेंट बोर्ड, खडकी / देहू रोड/ देवळाली/ अहमदनगर. कुलसचिव, महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहूरी, जिल्हा अहमदनगर कुलसचिव, मराठवाडा कृषि विद्यापीठ, परभणी कुलसचिव, पंजाबराव कृषि विद्यापीठ, अकोला कुलसचिव, कोकण कृषि विद्यापीठ, दापोली, जिल्हा रत्नागिरी. कुलसचिव, मुंबई विद्यापीठ, नागपूर. कुलसचिव, पुणे विद्यापीठ, पुणे. कुलसचिव, नागपूर विद्यापीठ, नागपूर कुलसचिव, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद कुलसचिव, स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड कुलसचिव, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर कुलसचिव, अमरावती विद्यापीठ, अमरावती कुलसचिव, श्रीमती नाथीबाई दामोदर ठाकरसी महिला विद्यापीठ, मुंबई

(शासन परिपत्रक, वित्त विभाग क्रमांक वेपूर- ११२३/प्र.क्र.५/सेवा-९, दिनांक २२.२.२०२४ चे सहपत्र

(पहा म.ना.से.(वेतन) नियम १९८१ मधील नियम १५)

(शासन निर्णय दिनांक १३ फेब्रुवारी, २०२३ नुसार पूर्वीच्या वेतनस्तरात निश्चित होणाऱ्या वेतनापेक्षा कमी वेतन निश्चित झालेल्या अधिकारी/कर्मचाऱ्यांसाठी)

विकल्पाचा नमुना

१) कर्मचाऱ्याचे नाव : ....

२) धारण केलेले पद : ....

३) शासन अधिसूचना दिनांक ३० जानेवारी, २०१९ नुसार मंजूर केलेला वेतनस्तर : **......................

४) शासन निर्णय, दिनांक १३ फेब्रुवारी, २०२३ नुसार सुधारित केलेला वेतनस्तर :** ....

५) कार्यालयाचे नाव :..

२. मी श्री./श्रीमती/कुमारी .... असा विकल्प देत आहे की, माझी दिनांक १.१.२०१६ रोजी शासन अधिसूचना दिनांक ३० जानेवारी, २०१९ नुसार माझ्या ....या पदास लागू केलेल्या वेतनस्तरात/आश्वासित प्रगती योजनेंतर्गत देय होणाऱ्या पहिल्या / दुसऱ्या/तिसऱ्या लाभानुसार लागू होणाऱ्या वेतनस्तरात दिनांक १.१.२०१६ रोजी वेतननिश्चिती करण्यात आली आहे. सद्यस्थितीत वित्त विभाग, शासन निर्णय क्र. वेपूर ११२१/प्र.क्र.४/सेवा-९, दिनांक १३ फेब्रुवारी, २०२३ अन्वये सदर पदास खंड – २ नुसार वेतनस्तर .... लागू केला आहे. त्यानुसार सुधारित वेतनस्तरात माझी दिनांक १.१.२०१६ रोजी शासन अधिसूचना दिनांक ३० जानेवारी, २०१९ नुसार वेतननिश्चिती केल्यास व तद्नंतर पदोन्नती अथवा आश्वासित प्रगती योजनेंतर्गत देय होणाऱ्या पहिल्या / दुसऱ्या /तिसऱ्या लाभानुसार वेतननिश्चिती केल्यास माझ्या पूर्वीच्या वेतनस्तरात निश्चित होणाऱ्या वेतनापेक्षा कमी वेतन निश्चित होत आहे. तरी मी वित्त विभाग, शासन परिपत्रक क्रमांक वेपूर-११२३/प्र.क्र.५/सेवा-९ दिनांक २२.२.२०२४ अन्वये दिलेल्या सुविधेनुसार पुढीलप्रमाणे विकल्प देत आहे.

१) मी दिनांक १.१.२०१६ पासून शासन अधिसूचना दिनांक ३० जानेवारी, २०१९ नुसार लागू झालेल्या वेतनस्तराची निवड करतो/करते.
   - माझ्या पुढील वेतनवाढीच्या दिनांकापर्यंत ....
   - माझे वेतन रु......................... पर्यंत वाढवणाऱ्या नंतरच्या वेतनवाढीच्या दिनांकापर्यंत
- मी पद रिक्त करेपर्यंत किंवा विद्यमान वेतनस्तरात वेतन घेण्याचे बंद करेपर्यंत.

हा विकल्प अंतिम असून, त्यामध्ये या दिनांकानंतर सुधारणा करण्यात येणार नाही.

ठिकाण : सही :

दिनांक : नाव :

(केवळ कार्यालयाने भरावयाचे)

प्रमाणित करण्यात येते की, * कायम / स्थानापन्न पद धारण करीत असलेल्या

- श्री / श्रीमती / कुमारी -- यांनी हा विकल्प, यथोचितरित्या स्वाक्षरीसह व विहित दिनांकापूर्वी मला सादर केला आहे.

ठिकाण : सही :

दिनांक : नाव :

कार्यालय प्रमुख :

- लागू नसेल ते खोडावे

** वेतन स्तर क्रमांक नमूद करावा.